महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव
jeevandeepvartanews2020@gmail.com
मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे
Rs.2/-

बुधवार ❖ ०६ नोव्हेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १३१ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

:: कार्यालय ::
९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com
news.thanejeevandeep@gmail.com

महायुती सरकार आल्यास...

मुख्यमंत्रीपद भाजपाच्या वाट्याला?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीत भाजप १०० चा आकडा गाठेल का? या प्रश्नाचे उत्तर देताना देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, ही निवडणूक आव्हानात्मक आहे. आम्हाला यात फायदा दिसत आहे. मात्र महायुतीचं सरकारच येईल, अशी परिस्थिती दिसत आहे. हा फायदा केंद्रातील सत्तेचा आहे की राज्यातील सत्तेचा हे महत्त्वाच नाही.

फायदा असणं हे गरजेचं असतं. केंद्रातील सत्तेचा फायदा यासाठी आहे की, मागील सरकारमध्ये लोकांनी पाहिले आहे. मागील सरकार केंद्रासोबत वाद घालायचं. केंद्राचे प्रोजेक्ट बंद करायचे. केंद्राचा पैसा आम्हाला नको, अशी भूमिका घ्यायचे. त्यामुळे महाराष्ट्रात नुकसान झाले आहे. मात्र त्यानंतर आमचे आणि केंद्राचे संबंध हे लोकांनी पाहिले आहेत. याचा आम्हाला फायदा होईल, असं देवेंद्र फडणविसांनी सांगितलं आहे. तसेच त्यांनी पुढील मुख्यमंत्रीपदावरही वक्तव्य केले आहे. ते आज साम टीव्हीला मुलाखत देत होते. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, फायटर प्लेनच्या प्रोजेक्टबाबत २०२१ साली टाटा कंपनीने ट्विट करत सांगितलं आहे, की आम्ही दिल्ली आणि गुजरात याचा अभ्यास करत आहोत. तसेच या दोन ठिकाणांपैकी एका ठिकाणी आम्ही जाणार आहोत. तेव्हा मविआचे सरकार होते. तेव्हा तुम्ही विरोध करायला हवा होता. मी तेव्हा विरोधी पक्षनेता होता. याबाबत मी टाटांना पत्र लिहून सांगितलं की असं करू नका. महाराष्ट्राचा विचार करा. मात्र मविआने प्रयत्नही केला नाही, असं म्हणत प्रोजेक्ट महाराष्ट्राबाहेर जाण्याच्या टीकेवर फडणविसांनी उत्तर दिले आहे.

आम्ही बाहेरच्यांना उमेदवारी दिली नाही, मात्र भाजपातून गेलेल्यांना मविआत उमेदवारी, फडणविसांचा ईं ला चिमटा

विधानसभा निवडणुकीत भाजप १०० चा आकडा गाठेल का? याचे उत्तर देताना ते म्हणाले की, एक लोकसभेचा अपवाद सोडला तर गेल्या २० वर्षात आमचा स्ट्राईक रेट चांगला आहे. लोकसभेतही आमचा स्ट्राईक रेट चांगला राहिला असता, मात्र लोकसभेत आमच्या विरोधात फेक नरेटिव्ह पसरवण्यात आला. त्यामुळे आमच्या जागा कमी आल्या. नाहीतर सर्वच निवडणुकीत आमचा स्ट्राईक रेट चांगला आहे, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. तसेच त्यांनी नंतर महाराष्ट्राच्या पुढील मुख्यमंत्रीपदावर भाष्य केले आहेत. महायुतीचं सरकार आल्यास मुख्यमंत्री भाजपचा होणार का? याचे उत्तर देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आम्ही

पान ४ वर ▶▶

ठाणे जिल्ह्यात २४४ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांमध्ये निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या ४७ उमेदवारांचे अर्ज बाद झाल्याने त्यांचे आमदार होण्याचे स्वप्न भंगले असतानाच, त्यापाठोपाठ सोमवारी उमेदवारी मागे घेण्याच्या दिवशी ३३४ उमेदवारांपैकी ९० उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. यामुळे जिल्ह्यात २४४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले आहेत.

ठाणे जिल्ह्यात एकूण १८ विधानसभा मतदारसंघ येतात. यामध्ये भिवंडी ग्रामीण, शहापूर, भिवंडी पश्चिम, भिवंडी पूर्व, कल्याण पश्चिम, मुरबाड, अंबरनाथ, उल्हासनगर, कल्याण पूर्व, डोंबिवली, कल्याण ग्रामीण, मिरा-भाईंदर, ओवळा-माजीवडा, कोपरी पाचपाखाडी, ठाणे शहर, मुंब्रा-कळवा, ऐरोली, बेलापूर या मतदारसंघांचा समावेश आहे. या मतदारसंघांमध्ये निवडणूक लढण्यासाठी ३८१ उमेदवारांनी ४९५ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. महायुती, महाविकास आघाडी, अपक्ष, बंडखोर उमेदवारांचा समावेश होता. हे सर्वजण निवडणूक लढण्याची तयारी करीत होते. परंतु अर्ज छाननी प्रक्रियेत ४७ उमेदवारांचे ७८ अर्ज बाद झाले आहेत. यामुळे हे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर पडल्याने त्यांचे आमदार होण्याचे स्वप्न भंगले. असे असले तरी बंडखोरांमुळे महायुती, महाविकास आघाडीची डोकेदुखी वाढली होती. दरम्यान, साम, दाम, दंड, भेद या सर्व पर्यांचा वापर करूनही काही ठिकाणी बंडोबांनी माघार घेतलेली नाही. तर, जिल्ह्यात काही ठिकाणी बंडोबांसह अपक्षांनी माघार घेतली. जिल्ह्यात

पान ४ वर ▶▶

उबाठा सेनेकडून अबू आझमी यांचं जंगी स्वागत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

मानखुर्द-शिवाजीनगरचे आमदार व समाजवादी पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अबू आझमी चौथ्यांदा विधानसभा निवडणुकीला उभे राहिले आहेत. यावेळी ते केवळ समाजवादी पार्टीचे उमेदवार नसून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आहेत. जागावाटपात मविआने सपाला दोन जागा सोडल्या आहेत. तर राज्यातील इतर सहा मतदारसंघांमध्ये सपाची मविआच्या उमेदवारांविरोधात मैत्रीपूर्ण लढत होणार आहे. दरम्यान, अबू आझमी हे यंदा शिवाजीनगरप्रमाणेच मानखुर्दमध्येही प्रचार करत आहेत. या प्रचारादरम्यान त्यांनी मानखुर्दच्या पीएमजीपी कॉलनीमधील शिवसेनेच्या शाखेला भेट दिली. यावेळी शिवसैनिकांनी अबू आझमी यांचं जंगी स्वागत केलं.

शिवसेनेच्या शाखेत बसून अबू आझमी यांनी शिवसेनेच्या कार्यकर्त्यांशी व परिसरात राहणाऱ्या

पान ४ वर ▶▶

लाडक्या बहिणींसाठी जेलमध्ये जायला तयार - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

महायुतीचे उमेदवार विश्वनाथ भोईर यांच्या कार्यालयाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : लाडकी बहिण योजना बंद करण्यासाठी महाविकास आघाडी दोनदा न्यायालयात गेली असून न्यायलयाने त्यांना फटकारले आहे. महाविकास आघाडीचे सरकार आल्यास या योजनेशी संबंधित अधिकाऱ्यांना आणि नेत्यांना जेल मध्ये टाकण्याची भाषा महाविकास आघाडीचे नेते करत असून लाडकी बहिण योजना सुरू राहण्यासाठी एका वेळा काय दहा वेळा जेल मध्ये जाण्यास तयार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. कल्याणमध्ये महायुतीचे उमेदवार आमदार विश्वनाथ भोईर यांच्या निवडणूक प्रचार कार्यालयाचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.

सावत्र भाऊ दुष्ट भाऊ विरोधासाठी एकत्र आले आहेत त्यांना जागा दाखवायची वेळ आली आहे. दिवाळीचे फटाके सर्वत्र फुटत आहेत, या निवडणुकीत आपल्याला ?टम बॉम्ब फोडायचे आहेत विरोधकांच्या खुर्ची खाली फटाके फुटायला लागल्या असून आताच छोट्या मोठ्या लवांग्या फुटायला

पान ४ वर ▶▶

शरद पवार संसदीय राजकारणातून निवृत्ती घेणार ?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

बारामतीः राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवारांनी संसदीय राजकारणातून निवृत्ती घेण्याचा विचार बोलून दाखवला आहे. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शरद पवार बारामती मतदारसंघात दौरे करत आहेत, सभा घेत आहेत, त्यावेळी बोलताना शरद पवारांनी निवृत्तीचे संकेत दिले आहेत. यावेळी बोलताना शरद पवार म्हणाले, मी सांगू इच्छितो की, मी सरकारमध्ये नाही. अजून दीड वर्ष आहेत, पुन्हा राज्यसभेत जायचं का नाही याचा विचार मला करावा लागेल. आता मी निवडणुका लढवणार नाही, १४ वेळा मी निवडणुका लढवल्या आहेत. महाविकास आघाडीचा पाठिंबा युगेंद्र पवार यांना आहे, एक नवीन नेतृत्व आहे त्यांना साथ द्या असंही यावेळी शरद पवारांनी म्हटलं आहे.

आपल्या विचारांचे सरकार आले तर भक्कमपणे युगेंद्र प्रश्न सोडवेल

अजित पवारांचं नाव न घेता शरद पवारांनी हल्लाबोल केला आहे. 'काही लोकं सांगतात, मी लोकांना सांगेल भावनेने आवाहन करेल, काही गरज नाही मी माझ्या लोकांना ओळखतो. सुप्रिया सुळे यांना ४८

पान ४ वर ▶▶

> 'मी सत्तेत नाही. मी राज्यसभेत आहे. अजून माझे दीड वर्ष बाकी आहे. दीड वर्षांनंतर राज्यसभेत जायचं की नाही याचा विचार मला करावा लागेल. लोकसभा मी लढणार नाही. कोणतीही निवडणूक लढणार नाही. किती निवडणुका करायच्या. आतापर्यंत १४ निवडणुका केल्या. तुम्ही एकदाही घरी पाठवलं नाही. दरवेळी निवडून देत आहात. त्यामुळे कुठे तरी थांबलं पाहिजे. नवी पिढी समोर आली पाहिजे हे सूत्र घेऊन मी कामाला लागलो आहे' असंही बारामतीत दौऱ्यावेळी शरद पवार म्हणाले आहेत.



जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE
B.A.
B.Com.
B.Sc. CHEMISTRY
B.Sc. MATHS
BAF
BMS
POST GRADUATE
M.Sc. CHEMISTRY
M.Com. ADVANCED ACCOUNTANCY
M.A. MARATHI
M.A. ECONOMICS
M.A. SOCIOLOGY
M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7719814142
9130580111

मतदारांची गैरसोय होणार नाही; अशा सुविधा उपलब्ध करा - अशोक शिनगारे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे, दि.०४ : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी ठाणे जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. येत्या २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतदान प्रक्रियेसाठी ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रावर मतदारांसाठी करण्यात आलेल्या सोयीसुविधांचा आढावा जिल्हाधिकारी तथा ?जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी आज घेतला. मतदान केंद्रावर मतदारांना कोणत्याही प्रकारच्या गैरसोईचा सामना करावा लागणार नाही व मतदान शांततेत पार पडेल, यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने व गांभीर्य लक्षात घेवून काम करण्याचे निर्देश सर्वांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात आज आश्वासित सोईसुविधांबाबतची आढावा बैठक जिल्हाधिकारी ? तथा ?जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली, त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, महापालिकांचे नगर अभियंता, तसेच ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रावर सोईसुविधांसाठी कार्यरत असलेले अभियंते उपस्थित होते.

ठाणे महानगरपालिका हद्दीत १ हजार ५४६ मतदान केंद्रे , कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीत १ हजार २६१ मतदान केंद्रे, ग्रामीण भागात १ हजार १२४ मतदान केंद्रे, नवी मुंबई महापालिका हद्दीत ८३१ मतदान केंद्रे, मीरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत ७५५ मतदान केंद्रे, भिवंडी महानगरपालिका हद्दीत ५८६ मतदान केंद्रे, उल्हासनगर महानगरपालिका ३९९ मतदान केंद्रे, तर सर्व नगरपालिका हद्दीत ४५३ मतदान केंद्रे आहेत. या सर्व मतदान केंद्रावर

पान ४ वर ▶▶

> ठाणे जिल्हयातील १८ विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रावर मतदारांसाठी सूचना फलक, दिशादर्शक, दिव्यांगासाठी रॅम्पची सुविधा, मतदार सहाय्य केंद्र, पुरेशी व्यवस्था, मंडप व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छ स्वच्छतागृहे, प्रतिक्षालय, रांगेतील मतदारांसाठी खुर्च्यांची व्यवस्था तसेच मंडपात असलेल्या मतदान केंद्रानजीक मोबाईल टॉयलेटची व्यवस्था, प्रथमोपचार सुविधा, मतदान केंद्रावर पाळणाघर, तसेच दिव्यांगासाठी व्हीलचेअरची सुविधा, पार्टीशन मध्ये तयार करण्यात आलेल्या मतदान केंद्रावर लावण्यात येणाऱ्या रांगांसाठी जागेची उपलब्धता आदी सर्व सुविधा देण्याच्या दृष्टीने प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नियोजन करावयाचे आहे. तसेच मतदान केंद्रावर आदल्या दिवशी पासून जाणाऱ्या मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना लागणारी आवश्यक साधनसामुग्री देखील उपलब्ध करुन देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

शाहू महाराज छत्रपती खासदारकीचा राजीनामा देणार?



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

सध्या कोल्हापूर उत्तर मतदारसंघाची चर्चा राज्यभरात सुरू आहे. कॉंग्रेसनं आधी राजेश लाटकर यांना उमेदवारी जाहीर केली. त्यानंतर अंतर्गत विरोधामुळे त्यांना डावलून मधुरिमाराजे छत्रपती यांना उमेदवारी दिली. अशातच काल मधुरिमाराजे यांनी ऐनवेळी माघार घेतली. अशा अनेक नाट्यमय घडामोड या मतदारसंघात घडल्या.

पान ४ वर ▶▶

शिवसेना आणि धनुष्यबाण हे बाळासाहेबांची प्रॉपर्टी - राज ठाकरे

महाराष्ट्र नवनिर्माण सेना
महाराष्ट्र नवनिर्माण सेना

आताच्या घाणेरड्या राजकारणापासून महाराष्ट्र वाचवणे गरजेचे

डोंबिवलीमध्ये राज ठाकरे बरसले

दै.ठाणे जीवनदिप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी) :
शिवसेना आणि धनुष्य बाण ही उद्धव ठाकरे किंवा एकनाथ शिंदे यांची प्रॉपर्टी नसुन ती बाळासाहेब ठाकरे यांची प्रॉपर्टी असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि घडयाळ चिन्ह हे देखील शरद पवार यांचेच असल्याचे परखड मत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यक्त करत उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचा समाचार घेतला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ डोंबिवली येथील जाहीर सभेतून फोडला. मनसेचे आमदार राजू पाटील, कल्याण पश्चिमचे उमेदवार उल्हास भोईर, उल्हासनगरचे उमेदवार भगवान भालेराव आणि मुरबाडच्या उमेदवार संगीता चेंदवणकर या उमेदवारांच्या प्रचारासाठी डोंबिवलीतील पी अँड टी कॉलनी येथे प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज ठाकरे यांनी जोरदार फटकेबाजी केली.

शिवसेना असू देत, राष्ट्रवादी असू दे, भाजप असु दे, मनसे असू दे की कोणताही राजकीय पक्ष. या सगळयांपेक्षा महाराष्ट्र मोठा असून कोणताही पक्ष टिकला नाही टिकला हे महत्त्वाचे नाही. महाराष्ट्र टिकला पाहिजे, आताच्या या घाणेरड्या राजकारणापासून महाराष्ट्राला वाचवणे गरजेचे सांगत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्यातील राजकीय परिस्थितीवर आसूड ओढले.एका मुख्यमंत्र्यांच्या राजकीय कार्यक्रमाच्या स्टेजवर लोकांची करमणूक म्हणून एका भोजपुरी महिलेने नृत्य केल्याच्या प्रकाराबद्दल संताप व्यक्त करताना राज ठाकरे यांनी सांगितले की ज्या महाराष्ट्राने अटकेपार झेंडे रोवले, ज्या महाराष्ट्राकडे एक सुसंस्कृत महाराष्ट्र म्हणून पाहिले जायचे त्याच महाराष्ट्रात असली दशा ? या गोष्टी तर उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये होत असल्याचे सांगत हीच का लाडकी बहीण योजना असा संतप्त सवाल उपस्थित करत एकनाथ शिंदे यांनी या प्रकाराकडे वैयक्तिक लक्ष घालण्याची सूचना केली. तसेच आपण आज केवळ आपल्याशी संवाद साधायला आलो असून पुन्हा १५ नोव्हेंबरला याच ठिकाणी येणार असल्याचे सांगितले.

महायुतीत कोण आहे महाविकास आघाडीत कोण आहे याचा कोणालाच थांगपत्ता नाही. कोणी कुठेही गेलेलं आहे. आमचा राजू विधानसभेत एकटा होता, मला खात्री होती माझा आमदार विकणारा नाही तर टिकणारा आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाचा बट्टयाबोळ झाला असतांना महाराष्ट्रातील तरुण हाताला काम मागत आहेत, शेतकरी आत्महत्या करत आहेत. हे लोकं फक्त मजा करत आहेत. जनता शांत बसली आहे मूक पणे मतदान करत आहेत म्हणून तुम्हाला गृहीत धरलं जातंय. आधी फोडाफोडीचं राजकारण सुरू होतं, आता तर पक्षचं फोडला जातोय.

महाराष्ट्र टिकण गरजेचं असून महाराष्ट्र बरबाद झाला तर छत्रपतींचं नाव घेता येणार नाही. महाराष्ट्रात एवढे प्रश्न प्रलंबित असतात मात्र यांची चेष्टा मस्करी सुरू आहे. महाराष्ट्रासाठी जागे रहा, जगाला हेवा वाटावा असा महाराष्ट्र घडवायचा आहे म्हणून एकदा महाराष्ट्र माझ्या हातात द्या असे आवाहन राज ठाकरे यांनी उपस्थितांना केले.तर कल्याण ग्रामीणचे मनसे आमदार आणि उमेदवार राजू पाटील यांनी आपल्या भाषणात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कार्यपद्धतीवर तुफान हल्ला चढवला. तसेच लोकसभा निवडणुकीला आपण केवळ राज ठाकरे यांनी आपल्याला सांगितल्यामुळेच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना मदत केली असा गौप्यस्फोट केला.

बॉम्बे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी अँण्ड रिसर्चमध्ये आंतरराष्ट्रीय परिषद

BOMBAY INSTITUTE OF PHARMACY & RESEARCH
'BIPR'sIntPhCon2024'

दै.ठाणे जीवनदिप वार्ता
कल्याण(कुणाल म्हात्रे) :
यशवंतराव भोसले एज्यूकेशन सोसायटी संचलित बॉम्बे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी अँण्ड रिसर्च, डोंबिवली या महाविद्यालयामध्ये औषध निर्मितीतील नाविन्यपूर्ण संशोधन' या विषयावरील 'बीआरपीआय-इंटफार्मकॉन-२०२५' ही पहिली एक-दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न झाली. जगभरातील १८५ विद्यार्थी, शिक्षक संशोधकांनी या परिषदेमध्ये सहभाग नोंदवला.

आधुनिक औषधशास्त्र आणि रोगप्रतिकारक उत्पादने यांच्या सहाय्याने फुफ्फुसाच्या आजाराशी लढा या विषयावर तंत्रज्ञान विद्यापीठ सिडनी, ऑस्ट्रेलिया येथील डॉ.कलम दूवा; ऑस्टियोपोरोसिस बरा करण्यासाठी पेप्टाइड थेरप्यूटिक्सचा आधुनिक पद्धतीने वापर या विषयावर रासायनिक तंत्रज्ञान संस्था, मुंबईच्या डॉ. वंदना पत्रावळे; विविध रोग यशस्वीपणे बरे करण्यासाठी आतड्यातील सूक्ष्मजंतूंचा वापर या विषयावर लवली प्रोफेशनल विद्यापीठ, पंजाब येथील डॉ. सचीनकुमार सिंग; डिजिटल थेरप्यूटिक्सः आरोग्यसेवेतील नवीन तंत्रज्ञान महर्षी दयानंद विद्यापीठ, हरियाणा येथील डॉ. हरिश दुरेजा; शाश्वत औषध संशोधन आणि निर्मितीमध्ये हरित रसायनशास्त्राचे महत्व या विषयावर पॉन्टिफिकल कॅथोलिक विद्यापीठ, चिली च्या डॉ. फ्लॅवीया झूकोनी; मेंदूशी संबंधित रोग बरे करण्यासाठीच्या औषधनिर्माणशास्त्रातील प्रगत पद्धती या विषयांवर अजमान विद्यापीठ, संयुक्त अरब अमिराती चे डॉ. गौरव गुप्ता यांची व्याख्याने झाली.

परिषदेचा उद्‌घाटन सोहळा इव्होनिक इंडिया प्रा. लि. चे संचालक डॉ.आशिष गुहा तर सांगता समारंभ ए.सी.जी कॅप्सूल चे जागतिक उत्पादन व्यवस्थापन प्रमुख डॉ. सुभाषीश चक्रबोर्ती यांच्या शुभहस्ते पार पडला. डॉ. परिझाद एलचिदाना आणि प्राचार्य डॉ. जॉन डिसोझा व्याख्यानसत्रांचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले.
ऑनलाईन पद्धतीने संशोधन पोष्टर स्पर्धचे आयोजन करण्यात आले. डॉ. समीर नदाफ आणि डॉ. दुर्गाचरण भागवत यांनी पोस्टर्सचे तसेच डॉ. सचिनकुमार पाटील आणि डॉ. अमोल शेटे यांनी पोस्टर्स सादरीकरणाचे मूल्यमापन केले.ओरीयंटल फार्मसी कॉलेजच्या सौ. पूजा व्यवहारे आणि आर सी. पटेल फार्मसी कॉलेज, शिरपूर च्या विवेक राजकुले यांनी उत्कृष्ट पोस्टर्स सादरीकरणाचे पारितोषिक पटकावले.

संशोधन उच्चशिक्षणाचा अविभाज्य घटक असल्याने अशाप्रकारचे उपक्रम भविष्यात अग्रक्रमाने राबवणार असल्याचं संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष अच्यूत्त सावंत भोसले यांनी याप्रसंगी सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी मल्हार नार्वेकर यानी मुलांमध्ये संशोधनवृत्ती निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधकांशी त्यांचा संवाद असणं गरजेचं असल्याचे मत यादरम्यान व्यक्त केलं. महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच संयोजनप्रमुख डॉ. जॉन डिसोझा यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन अंकिता गायकवाड आणि विनायक दुबे यांनी केले. सहसंयोजक प्रा. दिलीप मोरानी, प्रा. मंगेश बनसोडे तसेच कॉलेजचे सर्वच शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी समन्वयक यांच्या सहभाग आणि सहकार्याच्या जोरावर ही आंतरराष्ट्रीय परिषद अत्यंत उत्साहात यशस्वी पार पडली.

सामाजिक कार्यकर्ते 'अण्णा पंडित' यांची सोशल मीडियावर केलेली बदनामी भोवली

कमाल शेख व त्याच्या साथीदारांवर अॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल

दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :

ज्येष्ठ समाजसेवक महेंद्र तथा अण्णा पंडीत यांची फेसबुक या सामाजिक माध्यमावर अपमानजनक व बदनामीकारक पोस्ट प्रसारित केल्या प्रकरणी कमाल शेख व त्याच्या इतर साथीदारांवर अॅट्रोसिटी व बीएनएस कायद्यांतर्गत महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, कल्याण मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बदलापूर पूर्व येथील संजय नगर झोपडपट्टीतील काही शोषित पिडीत यांना कायदेशीर मदत व मार्गदर्शन करून त्यांच्यावर अन्याय करणाऱ्या आरोपींवर जून २०२४ मध्ये बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात फसवणूक व अॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यांमध्ये कमाल शेख हा सुद्धा एक आरोपी असून सध्या तो फरार आहे. या दाखल गुन्ह्यामध्ये अण्णा पंडित यांनी फिर्यादी संतोष साबळे यांच्या मनात विष कालवून त्यांना खोटा अॅट्रॉसिटी चा गुन्हा दाखल करण्यास भाग पाडले. अशा आशयाच्या बातमींचे कात्रण संकलित करून फेसबुक या सामाजिक माध्यमांवर प्रसारीत केले होते.
यामुळे जेष्ठ समाजसेवक आणि अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे प्रदेश सरचिटणीस तसेच श्रमिक (मु) पत्रकार संघाचे राज्य उपाध्यक्ष अण्णा पंडित यांची समाजात नाहक बदनामी झाली असून त्यांची सामाजिक प्रतिष्ठा जाणीवपूर्वक मलीन केल्याप्रकरणी कमाल शेख व त्याचे सहकारी यांच्यावर अॅट्रॉसिटी व बीएनएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस आयुक्त, सुर्यकांत जगदाळे हे करीत असुन अॅट्रोसीटी गुन्ह्यातील आरोपींना तात्काळ अटक न केल्यास पोलिस प्रशासना विरोधात आंदोलन करणार असल्याची माहिती अण्णा पंडीत यांनी पत्रकारांशी वार्तालाप करतांना दिली आहे.

निवडणूक निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे

- निवडणूक निरिक्षक रुही खान

दै.ठाणे जीवनदिप वार्ता
अलिबाग(प्रतिनिधी) :
निवडणूक प्रक्रिया निर्भय आणि मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन अलिबाग विधानसभा मतदारसंघाच्या सामान्य निवडणूक निरीक्षक (भा.प्र.से) रुही खान यांनी केले.
अलिबाग येथील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातील सभागृहात अपक्ष उमेदवारांना चिन्ह वाटप, आदर्श आचारसंहिता व खर्चाबाबत मार्गदर्शन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. उमेदवारांना मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी मुकेश चव्हाण, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विक्रम पाटील, रोशन शिंदे उपस्थित होते.
यावेळी मार्गदर्शन करताना श्रीमती खान यांनी सांगितले की विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तयारी केली आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करत निवडणूक यशस्वीपणे पार पाडण्यासाठी उमेदवारांनी प्रशासनाला सहकार्य करावे. निवडणूक प्रचार करतांना आयोगाच्या सुचनाचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घ्यावी.
निवडणूकीच्या प्रचाराकरीता एक खिडकी समितीकडून परवानगी घेणे अत्यंत आवश्यक आहे. कोणीही परवानगीशिवाय प्रचार सभा, गाडयावरील रॅली इ. करू नये. कोणताही पक्ष किंवा उमेदवार, ज्यामुळे विद्यमान मतभेद विकोपास जातील किंवा परस्परात द्वेष निर्माण होईल किंवा भिन्नभिन्न जाती व समाज, धार्मिक वा भाषिक यांच्यामध्ये तणाव उत्पन्न होईल असे कोणतेही कार्य करणार नाही. एकमेंका सोबत भांडण-तंटे करू नये.
आर्दश आचारसंहितेचे सर्व नियम अटी पाळावेत.मतदान शांततापूर्ण व सुव्यवस्थित रीतीने होत असल्याची आणि मतदारांना कोणताही उपद्रव न होता किंवा अडथळा न येता त्यांचा मताधिकार वापरण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळत असल्याची खातरजमा करण्यासाठी, मतदानाच्या कामावर असलेल्या अधिका-यांबरोबर सहकार्य करतील, त्यांच्या प्राधिकृत कार्यकत्यांना योग्य ते ओळखपत्रे द्यावी. मतदार वगळता, निवडणूक आयोगाकडून मिळालेला विधीग्राह्य पास ज्याच्याजवळ नाही अशी कोणतीही व्यक्ती मतदान मंडपात प्रवेश करणार नाही. मतदान पूर्ण करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपर्यंत पूर्ण होणाऱ्या ४८ तासांच्या कालावधीत जाहिर सभा घेण्यास मनाई असेल असेही श्रीमती खान यांनी सांगितले.
उमेदवारानी त्यांची दैंनदिन नोंदवही संपूर्ण प्रचार कार्यकाळात खर्च निरीक्षकासमोर सादर करणे आवश्यक आहे, निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला, निर्वाचित उमेदवाराच्या निवडणूकीच्या तीस दिवसांच्या आत सादर कारावयाचा असतो. उमेदवारासांठी स्वतंत्र निवडणूक खर्च नोंदवही असणे आवश्यक आहे. याबरोबरच उमेदवाराने घ्यावायची खबरदारी, परवानग्या अशा अनेक निवडणूकी संदर्भात आवश्यक त्या सर्व सूचना त्यांनी यावेळी दिल्या.
या बैठकीला निवडणूक लढविणारे उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते

उल्हासनगर विधानसभा निवडणुक रिंगणात १९ उमेदवार

७ उमेदवारांची माघार

दै.ठाणे जीवनदिप वार्ता
उल्हासनगर(प्रतिनिधी) :
उल्हासनगर विधानसभेतील या वर्षीची निवडणूक अत्यंत रंगतदार ठरली आहे. १४१ मतदारसंघात तब्बल २६ उमेदवार रिंगणात होते, मात्र आज सात उमेदवारांनी माघार घेतल्याने आता १९ उमेदवारांमध्ये जुगलबंदी पाहायला मिळणार आहे. विशेष म्हणजे महायुतीतील महत्त्वाचे नेते आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष भरत गंगोत्री यांनी बंडखोरी कायम ठेवत उमेदवारी अर्ज मागे घेतलेला नाही. त्यामुळे उल्हासनगरात राजकीय समीकरणे बदलली असल्याची चर्चा सुरु आहे.

महायुतीतील अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष भारत गंगोत्री यांनी आपली उमेदवारी कायम ठेऊन महायुतीच्या नेतृत्वाला आव्हान दिले आहे. गंगोत्री यांचे बंडखोरीतील हे पाऊल उल्हासनगरच्या राजकारणात एक मोठे वळण घेण्याची शक्यता आहे. या बंडखोरीमुळे महायुतीच्या प्रमुख नेत्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. दुसरीकडे, भारत गंगोत्री यांनी उमेदवारी मागे घेणार नसल्याचे ठामपणे सांगितले असून, आपल्या बंडखोरीच्या निर्णयाबद्दल कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असल्याचे ते सांगत आहे.
माघार घेणाऱ्या पाच उमेदवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार ओमी कलानी यांना समर्थन दिल्यामुळे, कलानी यांची ताकद वाढली आहे. या पाच उमेदवारांमध्ये बहुजन समाज पक्षाचे अब्दुल शेख, अपक्ष मनोज सयानी (लासी), पंचम कलानी, इब्राहिम अन्सारी आणि मोहोम्मद शहाबुद्दीन शेख यांचा समावेश आहे. कलानी यांना या समर्थनामुळे अधिक बळ मिळाले आहे, ज्याचा फायदा त्यांना मुख्य लढतीत होण्याची शक्यता आहे.

उल्हासनगर विधानसभेत यंदा मुख्य लढत भाजपचे कुमार आयलानी, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे ओमी कलानी, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे भगवान भालेराव, वंचित बहुजन आघाडीचे संजय गुप्ता, आणि महायुतीतील बंडखोर अपक्ष उमेदवार भरत गंगोत्री यांच्यात होणार आहे. त्यामुळे निवडणुकीतील लढत अत्यंत चुरशीची असून मतदारांमध्ये या लढतीबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. विविध विचारसरणींचे हे उमेदवार मतदारांमध्ये आपले प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत, ज्यामुळे निवडणुकीची रंगत वाढली आहे.
आता १९ उमेदवार निवडणुकीच्या मैदानात उतरले असून, त्यात ३ राष्ट्रीय पक्षांचे उमेदवार, ६ नोंदणीकृत पक्षांचे उमेदवार, आणि १० अपक्ष उमेदवारांचा समावेश आहे. या सर्व उमेदवारांना त्यांचे निवडणूक चिन्ह देण्यात आले आहेत, ज्यामुळे मतदारांना मतदानाचा स्पष्ट पर्याय मिळणार आहे. उल्हासनगर विधानसभा निवडणुकीत आता सर्व पक्ष आणि अपक्ष उमेदवारांनी आपापल्या समर्थकांसह प्रचारात पूर्ण ताकदीनिशी उतरले आहेत. भाजपचे आमदार कुमार आयलानी यांचे शहरातील काम, भारत गंगोत्री यांची बंडखोरी आणि ओमी कलानी यांना मिळालेले समर्थन या राजकीय खेळात निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. उल्हासनगरच्या राजकारणात कोण विजय प्राप्त करेल, हे पाहण्यासाठी सर्वांचे लक्ष या निवडणुकीकडे लागले आहे.

केंद्रीय खर्च निरीक्षक सुरेंद्र पाल सिंग यांच्याकडून

कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघातील उमेदवारांच्या खर्चाची तपासणी



दै.ठाणे जीवनदिप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी) :
केंद्रीय खर्च निरीक्षक सुरेंद्र पाल सिंग यांनी काल कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघातील उमेदवारांच्या खर्चाची प्रथम तपासणी केली. भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांनूसार केंद्रीय खर्च निरीक्षक यांनी उमेदवारांच्या दैनंदिन खर्चाचा हिशोब तीन वेळा तपासावयाचा आहे. त्याअनुषंगाने ही प्रथम खर्च तपासणी काल पार पडली.
केंद्रीय खर्च निरीक्षक सुरेंद्र पाल सिंग यांची, उमेदवारांच्या निवडणूक खर्चाबाबतची द्वितीय खर्च तपासणी सोमवार दि. ११ नोव्हेंबर रोजी व तृतीय खर्च तपासणी रविवार दि. १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजल्यापासून कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे कार्यालय, वै.ह.भ. प.सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुल, डोंबिवली (पूर्व) येथे होणार असून, या खर्च तपासणीचे वेळी उमेदवार, उमेदवारांचे प्रतिनिधी यांनी सर्व संबंधित नोंद वह्या-दैनंदिन खर्च नोंदवही, रोख नोंदवही, बँक नोंदवही, बँक पासबुक अथवा बँक खात्याचे विवरण पत्र, संबंधित प्रमाणके, देयके इ. अभिलेखासह उपस्थित रहावे, असे निर्देश कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर यांनी दिले आहेत.

मतदानाच्या दिवशी आठवडा बाजार पूर्णवेळ बंद ठेवण्याचे आदेश जारी

रायगड(प्रतिनिधी) : भारत निवडणूक आयोगाने दि.१५ ऑक्टोबर, २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम घोषित केला आहे. सर्वाना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी बुधवार दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानाच्या दिवशी रायगड जिल्ह्यातील ज्या ठिकाणी आठवडा बाजार भरणार आहे, अशा सर्व ठिकाणी बाजार व जत्रा पूर्णवेळ बंद ठेवण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी रायगड किशन जावळे जारी केला आहे.अधिनियम, १८६२ चे कलम ५ (ग) मधील तरतुदीनुसार या विधानसभा मतदार संघांच्या मतदार यादीत समाविष्ट असलेल्या प्रत्येक मतदाराला मतदान करता यावे, याकरिता बुधवार दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी सर्व ठिकाणी बाजार व जत्रा पूर्णवेळ बंद राहणार आहेत.

०६ नोव्हेंबर २०२४
बुधवार

मेष

तुमच्या कौटुंबिक जीवनात सुसंवाद वाढेल. आज तुम्हाला काही मोठी जबाबदारी पार पाडावी लागेल. आज तुम्हाला आर्थिक लाभाची संधी मिळेल.

वृषभ

यश मिळण्याची शक्यता आहे, अन्यथा तुमची प्रतिमा खराब होऊ शकते. आरोग्याशी संबंधित समस्येबाबत चांगल्या डॉक्टरांशी संपर्क साधाल.

मिथुन

तुमच्या नोकरीत काही सकारात्मक बदल होतील. आज तुम्ही कोणाकडून घेतलेले कर्ज परत कराल.तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत होईल.

कर्क

आर्थिक स्थिती मजबूत होईल. वैवाहिक जीवनात परस्पर स्नेह वाढेल. तुम्हाला सर्व त्रासांपासून आराममिळेल. कौटुंबिक जीवनात सुसंवाद वाढेल.

सिंह

विद्यार्थ्यांना त्यांच्या मेहनतीचे चांगले फळ मिळेल. वैवाहिक जीवनात आनंदाचे वातावरण राहील. धार्मिक कार्यात उत्साहाने सहभागी व्हाल.

कन्या

फॅशन डिझायनर्ससाठी आजचा दिवस चांगला राहील.वैवाहिक जीवनात मधुरता वाढेल. तुमच्या कौटुंबिक परिस्थिती पूर्वीपेक्षा अधिक अनुकूल होईल.

तूळ

आज तुम्हाला काही मोठी जबाबदारी पार पाडावी लागेल. आज तुम्हाला आर्थिक लाभाची संधी मिळेल. तुमची आर्थिक स्थिती मजबूत होईल.

वृश्चिक

काही धार्मिक विधीत सहभागी होण्याची संधी देखील मिळू शकते.आर्थिक स्थिती मजबूत होईल. कार्यक्षेत्रात यश मिळेल, अडथळ्यांनी भरलेली कामे पूर्ण होतील.

धनु

आज तुम्हाला मुलांकडून काही चांगली बातमी मिळेल.तुम्ही तुमच्या खाण्याच्या सवयींची विशेष काळजी घ्यावी. तुमच्या उत्पन्नाच्या तुलनेत तुमचे खर्च वाढतील.

मकर

वैवाहिक जीवनात परस्पर स्नेह वाढेल. सर्व त्रासांपासून आराम मिळेल.स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आज थोडी मेहनत करावी लागेल.

कुंभ

वैवाहिक जीवनात परस्पर समन्वय वाढेल. तुमचे कुटुंबीय काही कामासाठी तुमची प्रशंसा करतील. विद्यार्थ्यांची अभ्यासात आवड वाढेल.

मीन

नवीन कामात तुमची रुची वाढेल. विद्यार्थी आज आपल्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करतील.तुमचे शौर्य वाढेल. कामात तुमचे प्रयत्न यशस्वी होतील.

एक दिवाळी ह्यांच्यासाठी

शौर्य फाऊंडेशनच्या 'एक दिवाळी ह्यांच्यासाठी' या उपक्रमाच्या यंदाच्या सहाव्या वर्षीदेखील शौर्य फाऊंडेशनच्या वतीने ठाणे जिल्ह्यातील टिटवाळानजीक वसलेल्या कोनावाडी व घोडाखडक या दुर्गम भागातील आदिवासी भगिनींना दिवाळीनिमित्त साड्या आणि मुलींना ड्रेस व फराळ वाटप करण्यात आले. तसेच लहान मुलांना फटाके आणि शैशिणिक साहित्य देखील वाटण्यात आले ज्या बांधव-भगिनींना आर्थिक अडीचणींमुळे दिवाळी साजरी करता येत नाही अश्या लोकांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी हा या उपक्रमाचा मूळ उद्देश आहे व तो उद्देश साध्य करण्यासाठी ॲड जयेश ढोकणे, सागर चव्हाण, अंकिता चव्हाण, किशोर भलिंगे, आदित्य भोसले, रिद्धी चासकर,दिव्या चव्हाण,स्मिता आणि प्रणाली ई. सदस्यांनी उपक्रमात प्रामुख्याने सहभाग घेतला.

पेण पोलीसांकडून सराईत घरफोडी

चोरी करणा–या चोरास अटक

दै.ठाणे जीवनदिप वार्ता/पेण(प्रतिनिधी) :

पेण पोलीस ठाणे हद्दीत दिवसाच्या घरफोडी, चोरीचा गुन्हा दाखल झाला असुन पोलीस अधिक्षक रायगड सोमनाथ घार्गे अप्पर पोलीस अधिक्षक अभिजीत शिवथरे यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणणेबाबत सुचना दिल्या होत्या.

२१/१०/२०२४ रोजी सकाळी ११.४५ वा.चे सुमारास यांतील फिर्यादी नुतन बाळकृष्ण पाटील वय २४ वर्षे रा. रोडे-काश्मिरे रोड, काश्मिरेवाडी, पो. कांदळेपाडा, ता. पेण, जि. रायगड यांची आई, वडील व भाउ हे बाहेर गेल्याने घराला लॉक लावुन फिर्यादी त्यांचे घराचे बाजुला काकांच्या घरी गेलेल्या होत्या. त्यादरम्यान अनोळखी आरोपीत याने त्याचे घराचे दरवाजाचा लॉक कोणत्यातरी हत्याराने तोडुन त्यावाटे घरात प्रवेश करून आतील रूममधील लोखंडी कपाट उघडुन त्यातील ड्रॉव्हर कोणत्यातरी हत्यारे उपकुन सदर ड्रॉव्हरमधील सोन्याचा हार, सोन्याचे झुमके, सोन्याचा रिंगा व सोन्याची डवळी असे ६३,०००/- रूपये किंमतीचे सोन्याचे दागिने घेवुन त्याने सोबत आणलेल्या स्कुटीवर बसून तो पळुन गेला आहे. फिर्यादी व त्यांचे नातेवाईक यांनी आपसांत चर्चा करून सदरबाबत फिर्यादी यांनी पेण पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याने दिनांकः २२/१०/२०२४ रोजी पेण पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. २७८/२०२४ भा.न्या. सं.२०२३ चे कलम ३३१(३), ३०५(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पोलिस निरीक्षक संदिप बागुल यांचे आदेशाने सदर गुन्हयाचा तपास पोह/१५६८ अजिंक्य अनंत म्हात्रे यांचेकडे देण्यात आलेला असुन सदर गुन्हयाबात तपास उप विभागीय पोलीस अधिकारी पेण शिवाजी फाडतरे, यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक संदिप बागुल पेण पोलीस ठाणे यांच्या सुचनांनुसार गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे अधिकारी व अंमलदार हे करीत होते. सदर गुन्हयाचा तपास हा रोडवरील सी.सी.टी.व्ही फुटेज पाहुन, तांत्रिक विश्लेषण करून तसेच, गोपनिय माहितीच्या आधारे गुन्हा उघडकीस आणण्यास गुन्हे प्रकटीकरण शाखा पेण यांना यश आले आहे. सदर गुन्ह्यात आरोपीत अनिल लक्ष्मण नाईक वय ४१ वर्षे व्यवसाय-रिक्षा चालक, रा. गिरवले, मराठी शाळेजवळ, पो. सोमटणे, ता. पनवेल, जि. रायगड यास अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयातील आरोपी याने तपासादरम्यान गुन्हा केल्याची कबुली दिली असुन त्याच्या ताब्यातुन घरफोडी, चोरी केलेले सोन्याचे दागिने व गुन्हयात वापरलेली मोटार सायकल असा एकुण १,०३,०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तागत करण्यात आलेला आहे. सदर आरोपीत हा सराईत गुन्हेगार असुन आरोपीविरूध्द यापुर्वी गुन्हे दाखल आहेत.

पोलीस ठाणे पनवेल तालुका पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं.४३/२०१८भादंवि पनवेल तालुका पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं.१३७/२०१८ पनवेल शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं.३३५/२०२०भा.दं.वि कलम ३९४, ४५२ ४५४, ३८०,४५४, ३८० सदर गुन्हयाचा तपास गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे अधिकारी पोसई/ समद बेग, पोह/१५६८ अजिंक्य म्हात्रे, सहा. फौजदर/ राजेश पाटील, पोह/८७३ संतोष जाधव, पोह/१०४१ राजेंद्र भोनकर, पोह/८६१ प्रकाश कोकरे, पोह/१४२४ सुशांत भोईर, पोह/८८५ सचिन व्हस्कोटी, पोना/२३१९ अमोल म्हात्रे, पोशि/१९५१ गोविंद तलवारे यांनी केलेला आहे.

नरेंद्र पवारांची जबाबदारी आपण आणि देवेंद्रेजींनी घेतलीय

– मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पवार समर्थकांना ग्वाही

माजी आमदार नरेंद्र पवार यांच्यासह समर्थकांची घेतली भेट

दै.ठाणे जीवनदिप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी) :

राज्यामध्ये अडीच वर्षे महाविकास आघाडीची सत्ता असताना आपण सर्व जण वनवासात होतो. मात्र आपल्याला पुन्हा एकदा वनवासात जायचे नसून त्यासाठी महायुतीचे सरकार येणे आवश्यक असल्याचे सांगत नरेंद्र पवार यांची जबाबदारी आपण आणि देवेंद्र फडणवीसांनी घेतल्याचे सूतोवाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

माजी आमदार नरेंद्र पवार यांनी कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार विश्वनाथ भोईर यांच्याविरोधात दाखल केलेली उमेदवारी मागे घेतली. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कल्याणातील निवडणूक कार्यालयाच्या उद्घाटनानंतर नरेंद्र पवार आणि त्यांच्या समर्थकांची पवार यांच्या निवासस्थानी भेट घेत नरेंद्र पवार तसेच त्यांच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यावेळी राज्यामध्ये पुन्हा एकदा महायुतीची सत्ता पुन्हा येणे आवश्यक असल्याचे नरेंद्र पवार आणि त्यांच्या समर्थकांना पटवून दिले. त्यावेळी काही जणांनी मग नरेंद्र पवार यांचे काय असा थेट प्रश्न मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केला. त्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपण आणि देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची जबाबदारी घेतली असल्याचे स्पष्ट करताच उपस्थित समर्थकांनी टाळयांच्या कडकडाटात त्याचे स्वागत केले.

तर नरेंद्र पवार यांनी कल्याण मेट्रो, रिंगरोड प्रकल्प, घनकचरा प्रकल्प, मल्टीस्पेशलेटी हॉस्पिटल आणि डॉ. आंनदीबाई जोशी स्मारक प्रकल्प रखडल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याचे यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सांगितले. त्यावर मुख्यमंत्री शिंदे यांनीही त्यावर सकारात्मक प्रतिसाद देत यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याचे आश्वासन पवार यांना दिले.

शहापूर मतदार संघात ९ उमेदवार रिंगणात

११ उमेदवारांपैकी २ जणांची माघार

दोन माजी आमदार
एकमेकांसमोर
राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी
अशी रंगतदार लढत

निवडणूक निर्णय अ
१३५,शहापूर (अ
विधानसभा मतदा
स्वातंत्र्याचा
महोत्सव

निवडणूक अधिकारी
श्री. राहुल मुंडके यांच्या
अध्यक्षतेखाली पत्रकार परिषद संपन्न

दै.ठाणे जीवनदिप वार्ता
शहापूर(प्रतिनिधी) :

शहापूर विधानसभा मतदार संघात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी आज झालेल्या पत्रकार परिषदेत मतदार संघातील निवडणुकी संदर्भात महत्वपूर्ण माहिती दिली. शहापूर मतदार संघातील ११ पैकी २ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले असून एकूण नऊ उमेदवार रिंगणात आहेत....

१) राजेंद्र सीताराम म्हसकर (अपक्ष)
२)ज्ञानेश्वर निवृत्ती तळपाडे(अपक्ष).

या उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले. दौलत भिका दरोडा (रा. काँग्रेस पार्टी अजितदादा पवार), पांडुरंग महादू बरोरा (रा.काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार),

यशवंत गोपाळ वाघ (बहुजन समाज पार्टी),हरिश्चंद्र बांगो खंडवी (महाराष्ट्र नवनिर्माण सेना),रंजना काळूराम उघडा (अपक्ष),गौरव प्रकाश राजे (अपक्ष),गणेश केशव निरगुडे(अपक्ष), सौं.रमा बाळू शेंडे उर्फ रूपाली रविकांत आरज (अपक्ष), अविनाश यशवंत शिंगे (अपक्ष), हे उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले असून यावेळची शहापूर विधानसभा मतदार संघात मोठ्या प्रमाणात लढत पाहायला मिळणार आहे.

पुरोहित मंडळींचा रविंद्र चव्हाण यांना जाहिर पाठिंबा

श्री राजस्थान जैन श्वेतांबर मूर्ती पूजक संघ, लोहाणा समाज, यादव समाज, बिलावल असोसिएशन, युवा आशापुरा मंडल संस्था यांचाही कमळ फुलणार म्हणत दिले आशीर्वाद

दै.ठाणे जीवनदिप वार्ता
डोंबिवली(प्रतिनिधी) :

आपले सांस्कृतिक, अध्यात्मिक शहर आणि महायुती यांचा वैचारिक डीएनए एकच असून समस्त डोंबिवलीकर महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. डोंबिवलीतील देशस्थ शुक्ल यजुर्वेदीय पुरोहितांचे वेद विज्ञान मंडळातील सर्व सभासदांनी यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांना संपूर्ण पाठिंबा दर्शवला. तसेच 'आपण प्रचंड मताधिक्याने निवडून याल' असे सांगत विजयाचा विश्वास व्यक्त केला. यासोबतच 'पुढील सामाजिक कार्यासाठी जय, यश, बल लाभो' असे आशीर्वाद आणि शुभेच्छा दिल्या. या शुभाशीर्वादांमुळे निवडणूक लढवण्यासाठी शंभर हत्तींचं बळ मिळालं अशी प्रांजळ प्रतिक्रिया चव्हाण यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी पुरोहित मंडळाचे अध्यक्ष वेदमूर्ती अमोल विजय कुलकर्णी, संतोष पुराणिक, कोदंडपाणी कुलकर्णी, लक्ष्मण पारेकर, केदार पारेकर, राहुल शुक्ल, महेश जोशी, दिनेश उपासनी, श्री. यज्ञेश जोशी, कपिल भंडारी, सार्थक आराध्ये, श्रीपाद कुलकर्णी आणि श्री कुलकर्णी आदी सभासद उपस्थित होते.

डोंबिवलीत कमळच फुलणार !

शहरातील रामनगर येथील विविध संस्था आणि सोसायटी यांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक रामनगर मधील राजस्थान जैन संघ हॉल येथे संपन्न झाली. या बैठकीमध्ये श्री राजस्थान जैन श्वेतांबर मूर्ती पूजक संघ, लोहाणा समाज, यादव समाज, बिलावल असोसिएशन, युवा आशापुरा मंडल इ. संस्था यांचा सहभाग होता. त्या बैठकीदरम्यान उपस्थितांशी संवाद साधला तसेच त्यांनी मंत्री रविंद्र चव्हाण यांना शुभेच्छा दिल्या. त्या बैठकीदरम्यान सी.ए. जय जैन आणि ॲड. रोहन देसाई या युवकांचे सत्कार केले. त्यावेळी सर्व उपस्थितांनी डोंबिवलीत कमळच फुलणार असल्याचे सांगत विजयाचा विश्वास व्यक्त केला. या बैठकीला माजी नगरसेवक भाई देसाई, मंदार हळबे, मुकुंद पेडणेकर, माजी अध्यक्ष गिरीश साठे, युवा मोर्चा प्रदेश सचिव मिहिर देसाई, आशिष मौर्य, सिद्धांत घुले, सुनील वेताळ, स्वानंद भणगे आदी भाजपा पदाधिकारी तसेच किरण राजजी राणावत, प्रमोद ठक्कर, राजबहादूर यादव, लल्लन यादव, तगदराज राणावत, भावेश जैन, प्रदीप जैन, दिलीप कोठारी, सुखलाल जैन, तेजराज जैन आदी प्रमुख संस्था पदाधिकारी उपस्थित होते.

स्वर सारंगच्या वतिने

अवनी मतिमंद विद्यालय माळ येथे दीपसंध्या साजरी

दै.ठाणे जीवनदिप वार्ता
मुरबाड(दिलीप पवार) :

दीपावलीच्या सणाच्या निमित्ताने मुरबाड तालुक्यातील आदिवासी भागातील अवनी मतिमंद निवासी विद्यालय व कार्यशाळा माळ येथे मुलांसोबत स्वर सारंग प्रस्तुत गायक श्री. संजय घुडे महामार्ग पोलीस मदत केंद्र माळशेज, संगीतकार गायक महेश वाळकोळी, गायक कुणाल घोलप, मृदंगमनी दिनेश पवार, तबलावादक देवेश कराळे, आपल्या गायनाने दिपावली संध्या साजरी केली. सर्व मतिमंद विद्यार्थांनी दीपसंधेचा मनसोक्त आनंद घेतला. गायन व फटाक्यांची आतिषबाजी या दुग्धयुक्त शर्करा योगाने सर्व विद्यार्थी दिपावलीच्या आनंदामध्ये स्वतःला विसरून गेले होते असे अवनी मतिमंद विद्यालयाच्या संस्थापिका श्रीमती प्रतिभा इरकशेट्टी यांनी म्हटले आहे. संजय घुडे हे महाराष्ट्र पोलीस दलात कार्यरत असून ते उच्चशिक्षित आहेत, आपली नोकरी सांभाळून भजनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन व वारकरी संप्रदायाची परंपरा टिकवुन ठेवण्याचे काम करत आहेत.या कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. श्री ऋषिकेश इरकशेट्टी सर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सौ मधु इरकशेट्टी यांनी कार्यक्रम सुंदररित्या संपन्न होण्यासाठी मदत केली.

निवडणूक निरीक्षकांच्या उपस्थितीत मतदान यंत्रांची दुसरी सरमिसळ संपन्न

दै.ठाणे जीवनदिप वार्ता
रायगड(प्रतिनिधी) :

श्रीवर्धन व महाड विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी सामान्य निवडणूक निरीक्षक सतिश कुमार एस यांच्या उपस्थितीत मतदान यंत्राची दुसरी सरमिसळ (रँडमायझेशन) प्रक्रिया आज करण्यात आली.

यावेळी १९४-महाड विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.ज्ञानोबा बाणापुरे, १९३-श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी महेश पाटील उपस्थित होते.

निवडणूक निरीक्षक सतिश कुमार एस (सामान्य) यांनी उपस्थितांना श्रीवर्धन व महाड विधानसभा मतदारसंघातील संपूर्ण निवडणूक प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणि निःपक्षपातीपणे काम करावे अशा सूचना दिल्या.

१९३-श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघामध्ये ३५१ मतदान केंद्र असून याकरिता ४२१ बॅलेट यूनिट, ४२१ कंट्रोल युनिट तर ४५६ व्हीव्हीपॅटचे वाटप करण्यात आले आहे.

१९४-महाड विधानसभा मतदारसंघामध्ये ३९३ मतदान केंद्र असून याकरिता ४७१ बॅलेट यूनिट, ४७१ कंट्रोल युनिट तर ५१० व्हीव्हीपॅटचे वाटप करण्यात आले आहे.

संकर्षण कऱ्हाडेंच आपल्या सद्य राजकीय स्थितीवरंच खुपच सुंदर परखड भाष्य नेहमीच्या सुंदर कवितेतून

राजकारण आणि पांडुरंग

– संकर्षण कऱ्हाडे

महाराष्ट्रातली सगळी गावं तुझीच आहेत, तू अर्ज भरून पहावं..
मला वाटतं पांडुरंगा तू यंदा निवडणुकीला उभं राहावं

मग ना पावसातल्या सभा,
ना प्रचाराचा घाम..
तुझे स्टार प्रचारक देवा
ग्यानबा तुकाराम..

प्रचाराच्या जाहिरातीत याच्या ओव्या कानी पडतील..
बॅनर बघून वीट येण्यापेक्षा
हात जोडले जातील..

सगळं सुखाचं होईल तेव्हा
विपरित काही घडणार नाही पांडुरंगा..
आणि तू सगळयांचा असल्यामुळे
एकही मत जात पाहून पडणार नाही..

तुझा कुणीच विरोधक नसल्यानं
सगळयांना बरंच वाटंल..
अजून तरी पांडुरंगा तुझा कुणीच विरोधक नसल्यानं
सगळयांना बरंच वाटंल
अन् मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण
हे कोडंही लवकर सुटंल..

पहिली टर्म असली तरी देवा
बिनविरोध येशील आणि मुख्य म्हणजे
भल्याभल्यांना तुझ्या मंत्रिमंडळातही घेशील

सगळयांत मोठा निर्णय पांडुरंगा असा घे..
कायद्यासोबत गृहखातं
छत्रपती शिवाजी महाराजांना दे..

मग काय टाक देवा
कोण कायदा हातात घेईल..
अरे एका नजरेत अख्खा
महाराष्ट्र सुतासारखा सरळ होईल..

लाडक्या भावांवरचं समान प्रेम जिचा आदर्श म्हणून पहावं
त्या मुक्ताईकडे महिला व बालविकास खातं जावं..
(तुम्हाला वेगळा शब्द ऐकायची सवय आहे, माझ्या कवितेत
वेगळं लिहिलंय)
आणि साक्षरतेचे विठ्ठला काय दिवस येतील..
बुद्धिला वैभव आणणारे आमचे ज्ञानदेव शिक्षणमंत्री होतील..

अरे पाणी ज्यांच्या गाथेला तारून स्वतः खाली बुडलं..
जे सदेह आले स्वर्गात आणि तू दार उघडलं,
त्या तुकोबांच्या हाती दे हिशेबाच्या वह्या
आणि अर्थमंत्री म्हणून घे ताबडतोब त्यांच्या सह्या..

एकदम झाला आवाज हो.. लखलख वीज कडाडली.
वीटेवरची सावली माऊली माझ्यावरती चिडली..
काय लावली केव्हापासूनची तुझी ही बडबड आहे..
पांडुरंग म्हणाला..
काय लावली केव्हापासूनची तुझी ही बडबड आहे..
हे सगळं होणं आता अशक्य आणि अवघड आहे..
या थोरांना मंत्री करून मला सीएम करतोस हो रे
राजकारणात त्यांच्या नावाचा होतो तेवढा वापर पुरे..

राष्ट्राच्या भल्यासाठी बोलतोयस
म्हणून केव्हाचा ऐकतोय
पण ऐक आता एक उपाय
मी मन लावून सांगतोय..

माऊलीच्या रुपातला विठ्ठल
बापासारखा वागला
आणि जबाबदारीनं राष्ट्रासाठी
पुढं बोलू लागला..

मला म्हणाला गाथा, ज्ञानेश्वरी,
शिवचरित्र तुम्ही कोणी वाचता?
अन् मग कसं काय रे त्या जयंत्यांना तुम्ही डीजे लावून नाचता?

या सगळयांना तुम्ही
सोयीनुसार जातीमध्ये वाटलंत..
डोक्यावरती तर घेतलंत
पण डोक्यात नाही घातलं..

प्रत्येकात तुका, शिवाजी आहे..
जर विचारांचा घेतला वसा..
सुराज्यासाठीच काम करा मग कुणीही खुर्चीत बसा..

आणि कर्तृत्त्वाची वेळ आहे
आता नको नुसती बडबड
आधी मतदानाला वारी समजून
तू घराबाहेर पड..

आम्ही सगळे पाठिशी आहोत
तुम्ही खुशाल राहा..
अरे समोर महाराष्ट्र उभा आहे..
त्याच्यात पांडुरंग पाहा..'

मतदारांची गैरसोय होणार नाही...

पान १ वरून ▶▶ पुरविण्यात येणाऱ्या सोईसुविधांची जबाबदारी ही त्या त्या महानगरपालिका, नगरपालिका यांची असून ग्रामीण भागातील मतदान केंद्राची जबाबदारी ही जिल्हा परिषदेकडे आहे. या सर्व मतदान केंद्राची पाहणी ही त्या त्या आस्थापनातील अभियंत्यांनी प्रत्यक्ष जागेवर जावून करण्याचे निर्देशही जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी यावेळी दिले.

ठाणे जिल्हयातील १८ विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रावर मतदारांसाठी सूचना फलक, दिशादर्शक, दिव्यांगासाठी रॅम्पची सुविधा, मतदार सहाय्य केंद्र, पुरेशी व्यवस्था, मंडप व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छ स्वच्छतागृहे, प्रतिक्षालय, रांगेतील मतदारांसाठी खुर्च्यांची व्यवस्था तसेच मंडपात असलेल्या मतदान केंद्रानजीक मोबाईल? टॉयलेटची व्यवस्था, प्रथमोपचार सुविधा, मतदान केंद्रावर पाळणाघर, तसेच दिव्यांगासाठी व्हीलचेअरची सुविधा, पार्टीशन मध्ये तयार करण्यात आलेल्या मतदान केंद्रावर लावण्यात येणाऱ्या रांगांसाठी जागेची उपलब्धता आदी सर्व सुविधा देण्याच्या दृष्टीने प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नियोजन करावयाचे आहे. तसेच मतदान केंद्रावर आदल्या दिवशी पासून जाणाऱ्या मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना लागणारी आवश्यक साधनसामुग्री देखील उपलब्ध करुन देण्याच्या सूचना या बैठकीत देण्यात आल्या. तसेच त्या मतदान केंद्रावर काही अडचण निर्माण होत असतील तर त्याबाबतची माहिती तात्काळ कळवावी, त्यावर योग्य तो तोडगा काढण्यात येईल, असेही जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी नमूद केले. या बैठकीत ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील बूथ व त्या ठिकाणी करण्यात येत असलेल्या सुविधा याबाबतची माहिती जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी (PPT) सादरीकरणाच्या माध्यमातून अभियंत्यांकडून घेतली. तसेच विधानसभा मतदान केंद्राची पाहणी आपण स्वतः तसेच प्रत्येक विधानसभा मतदारसंघात नियुक्त करण्यात आलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यामार्फत करण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

रायगड जिल्ह्यात सात विधानसभा मतदार संघामध्ये ७३ उमेदवार रिंगणात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ **प्रतिनिधी**

पेण :- महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यात आज नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याच्या दिवशी ३८ उमेदवारांनी आपली नामनिर्देशन पत्रे मागे घेतल्यामुळे जिल्ह्यातील सात विधानसभा मतदार संघामध्ये एकूण ७३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहे. या जागांसाठी दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६.०० या वेळेत मतदान होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिली.

मतदार संघ निहाय उमेदवारांची माहिती पुढीलप्रमाणे

१८८- पनवेल विधानसभा मतदार संघामध्ये एकूण २३ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी १० उमेदवारांनी माघार घेतली असून आता १३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

१८९- कर्जत विधानसभा मतदार संघामध्ये एकूण १३ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी ०४ उमेदवारांनी माघार घेतली असून आता ०९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

१९०-उरण विधानसभा मतदार संघामध्ये एकूण १६ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी ०२ उमेदवारांनी माघार घेतली असून आता १४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

१९१ - पेण विधानसभा मतदार संघामध्ये एकूण १५ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी ०८ उमेदवारांनी माघार घेतली असून आता ०७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

१९२-अलिबाग विधानसभा मतदार संघामध्ये एकूण २३ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी ०९ उमेदवारांनी माघार घेतली असून आता १४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

१९३ - श्रीवर्धन विधानसभा मतदार संघामध्ये एकूण १३ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी ०२उमेदवारांनी माघार घेतली असून आता ११ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

१९४-महाड विधानसभा मतदार संघामध्ये एकूण ०८ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी ०३ उमेदवारांनी माघार घेतली असून आता ०५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

मुख्यमंत्रीपद भाजपच्या वाट्याला...

पान १ वरून ▶▶ मुख्यमंत्रीपदासाठी लढत नाही. महायुतीचे सरकार पुन्हा यायला हवे हे आमचं एकमेव ध्येय आहे. मुख्यमंत्री आमचे आहेत. त्यांच्या नेतृत्वात आमचं सरकार चाललं आहे. या सरकारने अनेक योजना आणल्या आहेत. आता निवडणुकीनंतर आम्ही तिघांनी यावर ठरवलं आहे. या महायुतीच्या तिन्ही पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष बसतील आणि यावर चर्चा करतील. जी चर्चा होईल ती मान्य असेल, असं उत्तर त्यांनी दिले आहे.

शाहू महाराज छत्रपती खासदारकीचा...

पान १ वरून ▶▶ मालत्रा, मधुरिमाराजे यांची माघार काँग्रेसचे नेते सतेज पाटील यांच्या चांगलीच जिव्हारी लागल्याचं पाहायल मिळतेय. त्यामुळे या निर्णयावर त्यांनी संताप व्यक्त केलाय. हे सगळं कसं घडलं, त्यावर काय प्रतिक्रिया आल्या, हे सविस्तर जाणून घेऊ.

शाहू महाराजांनी आणि मधुरिमाराजे यांनी आपली फसवणूक केल्याचं सतेज पाटील यांनी म्हटलंय. दरम्यान, मधुरिमाराजे यांनी माघार घेतल्यानंतर सतेज पाटलांचा संताप मीडियाच्या कॅमेऱ्यात कैद झाला. संतप्त पाटील यांनी अर्ज माघारीनंतर मधुरिमाराजे आणि शाहू छत्रपतींना उद्देशून केलेली वक्तव्य सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.

भाजपच्या हाती आयते कोलीत

यावरून आता भाजपाचे नेते धनंजय महाडिक यांनी शाहू महाराजांचा आणि कोल्हापुरातील राजघराण्याचा अवमान सतेज पाटलांनी केल्याचं म्हटलंत. माध्यमांशी बोलताना धनंजय महाडिक म्हणाले, 'शाहू महाराज खासदारकीचा राजीनामा देणार असल्याची माहिती मला सोशल मीडियाद्वारे समजली. त्यांनी राजीनाम्याचा निर्णय घेतला असेल तर त्यात आश्चर्य वाटण्याचं काही कारण नाही. कारण ज्या पद्धतीने शाहू महाराजांचा अवमान झाला तो कोणीही सहन करू शकणार नाही. आजपर्यंत कोणीही कोल्हापूरच्या राजघरण्याविषयी अशी वक्तव्यं करण्याचं धाडस केलं नव्हतं. पण सतेज पाटील स्वतःला सर्वोच्च समजतात. त्यामुळे त्यांनी महाराज आणि त्यांच्या कुटुंबियांविषयी अर्वाच्य भाषेत वक्तव्य केली आहेत. त्यामुळे महाराजांचं मन दुखावलं असेल हे सर्व वेदनादायी असून कोल्हापूरची जनता हे अजिबात सहन करणार नाही.

भाजप एकतर्फी विजयी होईल?

ज्या महाराजांसाठी ६ महिन्यांपूर्वी गादीचा मान, गादीचा मान सांगत मतं मागत होते. आज त्याच महाराजांना ते बोलत होते. सतेज पाटील एवढे मोठे झाले का? की ते राजघराण्यावर बोलायला लागले, असा सवाल महाडिकांनी केला. शिवाय जे कोल्हापूर उत्तरमध्ये घडलं त्याचा परिणाम जिल्ह्यातील पाचही जागांवर दिसून येईल. या सर्व जागांवर काँग्रेसचा सुपडा साफ होऊन भाजप एकतर्फी विजयी होईल असा विश्वासही महाडिक यांनी व्यक्त केला.

धडक कामगार युनियनचा महायुतीला पाठिंबा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
विशेष प्रतिनिधी, मुंबई

धडक कामगार युनियनचे संस्थापक महासचिव कामगार नेते अभिजीत राणे यांनी आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीला ठाम पाठिंबा व्यक्त केला आहे. महायुतीमध्ये समाविष्ट भारतीय जनता पक्ष आणि इतर घटक पक्ष महाराष्ट्राच्या प्रगतीचा आणि जनतेच्या कल्याणाचा अजेंडा पुढे नेत असून, यासाठी त्यांनी महायुतीच्या यशासाठी काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

'महायुतीच्या नेतृत्वाखालीच महाराष्ट्राच्या विकासाला गती मिळेल आणि समाजातील सर्व स्तरांपर्यंत न्याय पोहोचेल,' असे अभिजीत राणे यांनी सांगितले. 'कामगारांच्या हक्कांसाठी लढताना आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी काम करताना, मी आणि धडक कामगार युनियन पूर्ण ताकदीने

महायुतीच्या पाठीशी उभे आहोत. पक्षाचे विचार आणि धोरणं जनसामान्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवतील, असा माझा ठाम विश्वास आहे.'राणे यांनी या निवडणुकीत महायुतीच्या विजयासाठी प्रामाणिकपणे योगदान देण्याचं आवाहन सर्व कार्यकर्त्यांना केलं आहे. 'महायुतीच्या प्रत्येक घटक पक्षाच्या पाठबळाने आपण महाराष्ट्रात स्थिरता आणि प्रगतीचा नवा अध्याय लिहू. आगामी विधानसभा निवडणुकीत जनतेच्या विश्वासाचा विजय होईल आणि महायुतीच महाराष्ट्राचं भविष्य उज्ज्वल करेल,' असे त्यांनी नमूद केले.

अभिजीत राणे आणि धडक कामगार युनियनच्या नेतृत्वाखाली सर्व कार्यकर्त्यांनी महायुतीच्या यशासाठी एकजुटीने काम करण्याचा संकल्प केला असून, ही निवडणूक महायुतीसाठी ऐतिहासिक विजयाची ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

> **महायुतीच्या नेतृत्वाखालीच महाराष्ट्राच्या विकासाला गती मिळेल आणि समाजातील सर्व स्तरांपर्यंत न्याय पोहोचेल, कामगारांच्या हक्कांसाठी लढताना आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी काम करताना, मी आणि धडक कामगार युनियन पूर्ण ताकदीने महायुतीच्या पाठीशी उभे आहोत. पक्षाचे विचार आणि धोरणं जनसामान्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवतील, असा माझा ठाम विश्वास आहे.**
>
> **-अभिजीत राणे**
> **संस्थापक महासचिव,**
> **धडक कामगार युनियन**

उबाठा सेनेकडून...

पान १ वरून ▶▶ नागरिकांशी संवाद साधला. मानखुर्दमधील शिवसैनिकांचा गेल्या दोन दशकांपासून अबू आझमींबरोबर संघर्ष चालू आहे. असं असतानाही यावेळी अबू आझमी हे महाविकास आघाडीचे उमेदवार असल्यामुळे येथील शिवसैनिकांनी (ठाकरे) अबू आझमींचा प्रचार करण्याचा निर्णय घेतला आहे.

बालेकिल्ल्यावर अबू आझमींची पकड

मानखुर्द शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघ हा ईशान्य मुंबई लोकसभा मतदारसंघात येतो. २००९ साली झालेल्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतर हा नवा मतदारसंघ अस्तित्वात आला. २००९ पासून हा मतदारसंघ समाजवादी पार्टीचे नेते अबू आझमी यांच्याकडे राहिला आहे. अबू आझमी सलग तीन वेळा येथून आमदार म्हणून निवडून आले आहेत. या मतदारसंघात मुस्लीम मतदारांची संख्या मोठी असून त्यावर अबू आझमी यांची पकड आहे. या मतदारसंघात सध्या तरी आझमी यांना कोणी आव्हान देऊ शकेल अशी परिस्थिती दिसत नाही.

अब आझमींसमोर नवाब मलिकांचं आव्हान

या मतदारसंघातून एकूण ४१ इच्छूकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ४ अर्ज बाद करण्यात आले, तर. ३० अर्ज स्वीकारण्यात आले होते. त्यापैकी आठ जणांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले असून यंदा येथून २२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. राष्ट्रवादीने (अजित पवार) येथून नवाब मलिक यांना, तर समाजवादी पार्टीने भाजपाने येथून विद्यमान आमदार अबू आझमी यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं आहे. यासह शिवसेनेचे (शिंदे) सुरेश पाटील हे येथील महायुतीचे अधिकृत उमेदवार आहेत. दुसऱ्या बाजूला मनसेने जगदीश खांडेकर यांना उमेदवारी दिली आहे.

ठाणे जिल्ह्यात २४४...

पान १ वरून ▶▶ सोमवारी उमेदवारी मागे घेण्याच्या दिवशी ३३४ उमेदवारांपैकी ९० उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. यामुळे जिल्ह्यात २४४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले आहेत. यामुळे १८ विधानसभा मतदारसंघांतील उमेदवारांची यादी आता अंतिम झाली असून या उमेदवारांमध्ये आता लढती होणार आहेत. त्यात कोण बाजी मारणार, हे येत्या २३ नोव्हेंबरला स्पष्ट होईल.

भिवंडी ग्रामीणमध्ये ७ उमेदवार, शहापूरमध्ये ९ उमेदवार, भिवंडी पश्चिममध्ये १४ उमेदवार, भिवंडी पूर्वमध्ये ११ उमेदवार, कल्याण पश्चिममध्ये २४ उमेदवार, मुरबाडमध्ये ९ उमेदवार, अंबरनाथमध्ये २२ उमेदवार, उल्हासनगरमध्ये २१ उमेदवार, कल्याण पूर्वमध्ये १७ उमेदवार, डोंबिवलीमध्ये ८ उमेदवार, कल्याण ग्रामीणमध्ये १३ उमेदवार, मिरा-भाईंदरमध्ये १७ उमेदवार, ओवळा-माजीवाडामध्ये १४ उमेदवार, कोपरी पाचपाखाडीमध्ये ९ उमेदवार, ठाणे शहरमध्ये ८ उमेदवार, मुंब्रा-कळवामध्ये ११ उमेदवार, ऐरोलीमध्ये १७ उमेदवार आणि बेलापूरमध्ये १५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

विंचूदंश झालेल्या विवाहितेचा भाऊबीजेच्या दिवशीच मृत्यू

रत्नागिरीतील हृदय पिळवटून टाकणारी घटना

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
संगमेश्वर प्रतिनिधी

भाऊबीजेच्या दिवशी हृदय पिळवटून टाकणारा प्रकार समोर आला आहे. संगमेश्वर तालुक्यातील मानसकोंड येथील विंचू दंश झालेल्या २६ वर्षीय विवाहितेचा भाऊबीजेच्या दिवशीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मंजिरी वैभव फेपडे असं मृत्यू झालेल्या महिलेचं नाव आहे. तिच्या मृत्यूमुळे मानसकोंड गावावर शोककळा पसरली आहे. तिला दीड वर्षाची मुलगी आहे.

विंचू दंश झाल्यानंतर मंजिरीला रत्नागिरी जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं होतं. मात्र तिला अचानक श्वसनाचा त्रास जाणवू लागला. डॉक्टरानी तिला कोल्हापूर येथे हलवण्यास सांगितलं. कोल्हापूर येथे उपचारासाठी नेतानाच तिचा मृत्यू झाला. तिच्या या मृत्यूची माहिती मिळताच गावावर शोककळा पसरली. मंजिरी हिचे मानसकोंड येथेच माहेर आणि सासर आहे. तिला दीड वर्षाची मुलगी असल्याने गावात हळहळ व्यक्त होत आहे.

३ नोव्हेंबर रोजी देशभरात भाऊबीजेचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी बहीण ही भावाच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते. मात्र याच दिवशी वरोरा तालुक्यातील एका बहिणीला भावाची सोबत गमवावी लागली आहे. हा भाऊ भाऊबीजेसाठी बहिणीकडे जात असताना हा धक्कादायक प्रकार समोर आला. वरोरा तालुक्यातील पोंभुर्णा तालुक्यात ही घटना घडली. भाऊबीजेच्या दिवशीच भावाच्या प्रेमाला बहीण पोरकी झाली.

लाडक्या बहिणींसाठी...

पान १ वरून ▶▶ लागल्या आहेत असा ही टोला नाव न घेता विरोधकांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कल्याणात लगावला.

तुमच्या आघाडी सरकारने अडीच वर्षांत काय केले? आणि महायुती सरकारने दोन वर्षांत काय केले हे होऊन जाऊ द्या दूध का दूध पानी का पानी, आम्ही हिशोब द्यायला तयार असून तुम्ही काय केले ते सांगा अशा शब्दांमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडीला खुले आव्हान दिले. आमचे सरकार हे देना बँक आहे लेना बँक नाही. हे तुमच्या खात्यामध्ये ५ हफ्ते भरणारे सरकार आहे. पूर्वीचे सरकार हे हफ्ते घेणारे होते. त्यामुळेच त्यांचे मंत्री, अधिकारी जेलमध्ये गेले. पण आमचे सरकार हे तुमच्या खात्यामध्ये हफ्ते भरणारे सरकार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान या उद्घाटन सोहळयाला शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी, रिपाई महायुतीचे प्रमुख नेते, शेकडो समर्थक आणि हजारो लाडक्या बहिणी उपस्थित असल्याने प्रचंड मोठी गर्दी झाली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कार्यक्रमस्थळी दाखल झाल्यावर स्टेजपर्यंत पोहोचण्यासाठी पोलीस प्रशासन आणि त्यांचे सुरक्षारक्षक यांची चांगलीच दमछाक झाल्याचे दिसून आले.

शरद पवार संसदीय सन्यास...

पान १ वरून ▶▶ हजार मते जास्त देईल, त्यामुळे उद्याच्या निवडणुकीत आपण आपले प्रश्न सोडवून घेऊया. मला आता आमदारकी नको , खासदारकी नको मला लोकांचे प्रश्न सोडवायचेत. जर आपल्या विचारांचे सरकार आले तर भक्कमपणे युगेंद्र इथले प्रश्न सोडवेल, असं आश्वासन देखील त्यांनी यावेळी दिलं आहे.

एका राज्याचं काम करत असाल तर पंतप्रधान कशाला होता?

तुम्ही देशाचे पंतप्रधान आहात. तुम्ही फक्त एका राज्याचं काम करत असाल तर पंतप्रधान कशाला होता? जाऊन तिथे मुख्यमंत्री व्हा.

माझी काही तक्रार नाही. पण हे जे काही घडतं आहे ते राज्याच्या हिताचं नाही. देशाच्या हिताचं नाही. अनेक राज्यात हाताला काम नाही. इथल्या राज्यकर्त्यांनी इथल्या राज्यातील लोकांच्या हितासाठी जी धमक दाखवायची, ती दाखवत नाहीत. त्याचा परिणाम म्हणजे आमचं काम दुसरीकडे चाललं आहे. ते थांबवायचं असेल तर इथली सत्ता बदलली पाहिजे. सत्ता बदलण्याशिवाय गत्यंतर नाही. शेतीला पाणी आणि हाताला काम यासाठी अधिक लक्ष देण्याची गरज आहे. तरच सरकारचा दृष्टीकोण चांगला राहतो. दुर्दैवाने दिल्ली आणि राज्याचे राज्यकर्ते त्या दृष्टीने काम करत नाहीत, असा हल्लाबोल शरद पवारांनी यावेळी राज्य आणि केंद्र सरकारवर केला आहे.

मतदानवाला वासुदेव आला !

गाण्याच्या माध्यमातून वासुदेवाने केली मतदान जनजागृती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ **प्रतिनिधी**

ठाणे : मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ अंतर्गत १४७ कोपरी पाचपाखाडी विधानसभा निवडणूक कार्यालयाच्या वतीने मतदान जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. आता या उपक्रमामध्ये वासुदेवही सहभागी झाला असून आपल्या कलेद्वारे नागरिकांमध्ये त्यांच्या गाण्याच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व सांगितले. तसेच सर्वांना मतदान करण्याचे आवाहन केले. विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी १४७ कोपरी पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघाच्या स्वीप कार्यक्रमाची अमंलबजावणी करण्यात येत आहे. प्रत्येक सज्ञान नागरिकाला भारतीय संविधानाने मतदान करण्याचा समान हक्क

प्रदान केलेला आहे. कोणताच घटक मतदानापासून वंचित नाही राहिला पाहिजे या संकल्पनेअंतर्गत मतदान जनजागृती करण्यात येत आहे. ठाणे शहरातील कमी मतदान झालेल्या शांतीनगर, किसन नगर, श्रीनगर या विभागातील गृहसंकुलात बॅनर व स्टीकर्स लावून तसेच लघुउद्योजक, श्रीनगर बसथांब्यावर प्रवासी यांचेशी संवाद साधून वासुदेव यांचे मार्फत दि. ०३ नोव्हेंबर २०२४ रोजी स्वीप टिमने जनजागृती केली. सदरचा मतदान जनजागृती कार्यक्रम निवडणूक निर्णय अधिकारी सर्जेराव म्हस्के पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मिलींद मुंडे यांच्या प्रेरणेने आणि स्वीप पथक समन्वयक कमलाकांत म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली स्वीप टिमचे राजेन्द्र परदेशी, अनंत सोनावळे, सिताराम परब पार पडत आहे.

उल्हासनगरात पंचरंगी लढत

कलानी, आयलानी समोर आव्हान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : भारत गंगोत्री यांच्या बंडखोरीने ओमी कलानी व कुमार आयलानी यांच्या टेन्शन मध्ये वाढ होऊन सिंधी मते विभागण्याची भीती व्यक्त होत आहे. एकूण १९ उमेदवार रिंगणात असलेतरी खरी लढत कलानी, आयलानी, भारत गंगोत्री, मनसेचे भगवान भालेराव व वंचितचे संजय गुप्ता यांच्यात होणार असल्याची शक्यता आहे.

उल्हासनगर सिंधी बहुल मतदारसंघ असून आजपर्यंत सिंधी समाजाचा उमेदवार निवडून आला. मात्र यावेळी चित्र वेगळे असून सिंधी विरुद्ध नॉनसिंधी असा सामना होण्याची शक्यता आहे. मतदारसंघात ४० टक्के सिंधी समाज असलातरी मतदान करण्यासाठी सिंधी समाज पूर्ण शक्तींनीशी बाहेर पडत नाही. तर नॉनसिंधी समाजाची संख्या ६० टक्क्यावर गेल्याने, नॉनसिंधी आमदार हवा. अशी मागणी होत आहे. यापूर्वी सिंधी समाजासह नॉनसिंधी समाज आयलानी व कलानी यांच्या मागे उभा राहिला. मात्र या निवडणुकीत आयलानी, कलानी व गंगोत्री यांच्यात सिंधी मतदारांची विभागणी होणार असून नॉनसिंधी समाज कोणाच्या पाठीमागे उभे राहतो. यावर कलानी व आयलानी यांचा जय पराजय निश्चित होणार आहे.

महाविकास आघाडीचे ओमी कलानी व महायुतीचे कुमार आयलानी यांच्यात खरी लढत असलेतरी भारत गंगोत्री यांच्यासह मनसेचे भगवान भालेराव व वंचितचे संजय गुप्ता यांच्यात खरी लढत आहे. मराठी व उत्तर भारतीय मतांसह मुस्लिम मतदार निर्णायक भूमिका वठविणार आहेत. तर दलितांचे एकगठ्ठा मते ज्यांच्या पारड्यात पडणार त्याचा विजय निश्चित मानला जात आहे. भाजप व शिंदेसेनेत मुख्यमंत्री यांच्यावरील टिकेने वितुष्ट आले असून अजित पवार गटाचे अस्तित्व प्रभावी नाही. त्यामुळे आयलानी यांची कोंडी झाली. तर ओमी कलानी यांच्यावर अनेक गुन्हे दाखल असून ओमी दुपार नंतर उठतो. असा प्रचार कलानी विरोधक करीत आहेत. तर वंचितचे उमेदवार गुप्ता हे उत्तर भारतीय व दलित कार्ड खेळत असून मनसेचे भगवान भालेराव यांनी मराठी चेहरा कार्ड पुढे आणले आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी